संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते जुलै,२०१९ करिता अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: संगांयो -२०१९/प्र.क्र. ३८/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २४ एप्रिल, २०१९.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/ प्र.क्र.१७५/ विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.मकोनी-१०१०/प्र.क्र.३२/कोषा-प्र.५, दि.१५ एप्रिल, २०१०.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९.
४. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीजीटी २०१९/ प्र.क्र.१६/अर्थसंकल्प, दिनांक १० एप्रिल, २०१९.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता **सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी** संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये ४१७,९०,३३,०००/- (रुपये पाचशे सदुसष्ठ कोटी नव्वद लक्ष तेहतीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रक व अर्थसंकल्प कार्यासनाचे संदर्भ क्रमांक ४ येथील ज्ञापनान्वये संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या कालावधीच्या खर्चासाठी लेखानुदानाद्वारे मंजूर केलेली रक्कम रुपये १३९,३०,०८,०००/- (रुपये एकशे एकोणचाळीस कोटी तीस लक्ष आठ हजार फक्त) वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयाना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. सदरचे अनुदान वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे. संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च "मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, १०४-वृध्द विकलांग व निराश्रीत व्यक्तींचे कल्याण (०८) (०९) संजय गांधी निराधार अनुदान योजना (कार्यक्रम) (२२३५ अे २९४) ५०-इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र.३ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अर्थसं २०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०४२४१६१६०९५६२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundlik Wagh

Digitally signed by Prashant Pundlik Wagh
DN: CN = Prashant Pundlik Wagh, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice and Special Assistance
Date: 2019.04.24 16:20:10 +05'30'

(प्रशान्त पुं. वाघ)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य , मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७) वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८) उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड नस्ती, विसयो.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र.संगायो-२०१९/प्र.क्र.३८/विसयो, दिनांक : २४ एप्रिल, २०१९ सोबतचे सहपत्र. .

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता अनुदानाचे वितरण

संजय गांधी निराधार अनुदान योजना (२२३५ ए २९४)

सर्वसाधारण लाभार्थी संख्या (रक्कम रुपयात)

अ.क्र.	जिल्हा	नियंत्रक अधिकारी क्रमांक	सर्वसाधारणलाभार्थी संख्या	एप्रिल, १९	मे, १९	जुन, १९	जुलै, १९	या आदेशान्वये एकूण वितरीत रक्कम
१	२	३	४	५	६	७	८	९
१	मुंबई शहर	N0028	२७६८	१३१९२७३	१३१९२७३	१३१९२७३	१३१९२७३	५२७७०९२
२	मुंबईउपनगर	N0029	३३९०	१६१५७२८	१६१५७२८	१६१५७२८	१६१५७२८	६४६२९१२
३	ठाणे	N0036	६१९९	२९५४५४३	२९५४५४३	२९५४५४३	२९५४५४३	११८१८१७२
४	रायगड	N0012	११०८१	५२८१३८३	५२८१३८३	५२८१३८३	५२८१३८३	२११२५५३२
५	रत्नागिरी	N0023	१४८२८	७०६७२६४	७०६७२६४	७०६७२६४	७०६७२६४	२८२६९०५६
६	सिंधुदूर्ग	N0018	७९४६	३७८७१९२	३७८७१९२	३७८७१९२	३७८७१९२	१५१४८७६८
७	पालघर	N0037	२६२३	१२५०१६४	१२५०१६४	१२५०१६४	१२५०१६४	५०००६५६
	कोंकण विभाग		**४८८३५**	**२३२७५५४७**	**२३२७५५४७**	**२३२७५५४७**	**२३२७५५४७**	**९३१०२१८८**
८	नाशिक	N0006	२६२३४	१२५०३५४८	१२५०३५४८	१२५०३५४८	१२५०३५४८	५००१४१९२
९	धुळे	N0026	१२९५४	६१७४०८५	६१७४०८५	६१७४०८५	६१७४०८५	२४६९६३४०
१०	जळगाव	N0010	३९८०६	१८९७२१८३	१८९७२१८३	१८९७२१८३	१८९७२१८३	७५८८८७३२
११	अहमदनगर	N0030	३१४८३	१५००५३०७	१५००५३०७	१५००५३०७	१५००५३०७	६००२१२२८
१२	नंदुरबार	N0027	४३८०	२०८७५७८	२०८७५७८	२०८७५७८	२०८७५७८	८३५०३१२
	नाशिक विभाग		**११४८५७**	**५४७४२७०१**	**५४७४२७०१**	**५४७४२७०१**	**५४७४२७०१**	**२१८९७०८०४**
१३	पुणे	N0040	२६९६०	१२८४९५७२	१२८४९५७२	१२८४९५७२	१२८४९५७२	५१३९८२८८
१४	सोलापूर	N0019	३९७९६	१८९६७४१७	१८९६७४१७	१८९६७४१७	१८९६७४१७	७५८६९६६८
१५	सातारा	N0032	२४३३८	११५९९८८४	११५९९८८४	११५९९८८४	११५९९८८४	४६३९९५३६
१६	सांगली	N0008	२१३९९	१०१९९१०९	१०१९९१०९	१०१९९१०९	१०१९९१०९	४०७९६४३६
१७	कोल्हापूर	N0039	३२९६६	१५७१२१२८	१५७१२१२८	१५७१२१२८	१५७१२१२८	६२८४८५१२
	पुणे विभाग		**१४५,४५९**	**६९३२८११०**	**६९३२८११०**	**६९३२८११०**	**६९३२८११०**	**२७७३१२४४०**
१८	नागपूर	N0014	५३९५२	२५७१४३९५	२५७१४३९५	२५७१४३९५	२५७१४४६७	१०२८५७६५२
१९	वर्धा	N0025	१२२६३	५८४४७४४	५८४४७४४	५८४४७४४	५८४४७४४	२३३७८९७६
२०	चंद्रपूर	N0021	२५३८२	१२०९७४७१	१२०९७४७१	१२०९७४७१	१२०९७४७१	४८३८९८८४
२१	भंडारा	N0033	२०४३३	९७३८६९८	९७३८६९८	९७३८६९८	९७३८६९८	३८९५४७९२
२२	गडचिरोली	N0013	९३१५	४४३९६७९	४४३९६७९	४४३९६७९	४४३९६७९	१७७५८७१६
२३	गोंदिया	N0024	१९८६१	९४६६०७३	९४६६०७३	९४६६०७३	९४६६०७३	३७८६४२९२
	नागपूर विभाग		**१४१,२०६**	**६७३०१०६०**	**६७३०१०६०**	**६७३०१०६०**	**६७३०११३२**	**२६९२०४३१२**
२४	अमरावती	N0011	३७४९२	१७८६९२९३	१७८६९२९३	१७८६९२९३	१७८६९२९३	७१४७७१७२
२५	अकोला	N0041	२९४०६	१४०१५३७५	१४०१५३७५	१४०१५३७५	१४०१५३७५	५६०६१५००
२६	यवतमाळ	N0007	३०८१०	१४६८४५४४	१४६८४५४४	१४६८४५४४	१४६८४५४४	५८७३८१७६
२७	बुलढाणा	N0038	२८२५३	१३४६५८३६	१३४६५८३६	१३४६५८३६	१३४६५८३६	५३८६३३४४
२८	वाशिम	N0022	१८२६६	८७०५८७१	८७०५८७१	८७०५८७१	८७०५८७१	३४८२३४८४
	अमरावती विभाग		**१४४२२७**	**६८७४०९१९**	**६८७४०९१९**	**६८७४०९१९**	**६८७४०९१९**	**२७४९६३६७६**
२९	औरगाबाद	N0035	१३५०९	६४३८६०७	६४३८६०७	६४३८६०७	६४३८६०७	२५७५४४२८
३०	बीड	N0034	३०७१४	१४६३८७८९	१४६३८७८९	१४६३८७८९	१४६३८७८९	५८५५५१५६
३१	नांदेड	N0031	१०११३	४८२००१९	४८२००१९	४८२००१९	४८२००१९	१९२८००७६
३२	परभणी	N0016	१७८५६	८५१०४५८	८५१०४५८	८५१०४५८	८५१०४५८	३४०४१८३२
३३	उस्मानाबाद	N0020	२८३१२	१३४९३९५७	१३४९३९५७	१३४९३९५७	१३४९३९५७	५३९७५८२८
३४	जालना	N0015	१४७१६	७०१३८८३	७०१३८८३	७०१३८८३	७०१३८८३	२८०५५५३२
३५	लातूर	N0009	१५०९५	७१९४५२१	७१९४५२१	७१९४५२१	७१९४५२१	२८७७८०८४
३६	हिंगोली	N0017	५७७७	२७५३४११	२७५३४११	२७५३४११	२७५३४११	११०१३६४४
	औरंगाबाद विभाग		**१३६०९२**	**६४८६३६४५**	**६४८६३६४५**	**६४८६३६४५**	**६४८६३६४५**	**२५९४५४५८०**
	एकूण		**७३०६७६**	**३४८२५१९८२**	**३४८२५१९८२**	**३४८२५१९८२**	**३४८२५२०५४**	**१३९३००८०००**